दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१० वा | गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ताः औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
-: संपर्क :-
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा-फंटा

ज्ञानेश महाराव

"दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए" हे नाशिकचा लिंगपिसाट ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने पुन्हा दाखवून दिलंय. अशाच्या बदकर्मी धंद्याचं मार्केटिंग "महाराष्ट्र राज्य महिला आयोग"च्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी करावं, ह्यात धक्कादायक काही नाही. ही युतीदेखील नवी नाही.

थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी (जन्म : २४ ऑगस्ट १८८०; निधन : ३ डिसेंबर १९५१) ह्या निरक्षर होत्या. पण त्यांच्याकडे अद्भुत प्रतिभा, मर्मभेदी दृष्टी आणि विलक्षण समाजभान होतं. म्हणूनच त्यांनी ठणकावून सांगितलंय –

नको नको रे ज्योतिषा।
माज्या दारी नको येऊ।
माझे दैव मला कळे।
माझा हात नको पाहू॥१
म्हणे नशिबाचे नऊ ग्रह।
तळहाताच्या रेघोट्या।
बापा नको मारू थापा।
अशा उगा खऱ्या खोट्या॥२

अशा खणखणीत शब्दांत बहिणाबाईंनी दारी आलेल्या ज्योतिष्याला हाकललंय. याउलट, ज्याला महिला लैंगिक शोषणाच्या प्रकरणात त्या कॅप्टन अशोक खरात ह्या ज्योतिष्याला नाशिक पोलिसांनी अटक केलं; त्याच्या दारी सुशिक्षित, मान्यवर मंडळी जायची. त्याच्या दर्शन- मार्गदर्शनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राधाकृष्ण विखे, दादा भुसे यांच्यासह आठ मंत्री नाशिकला अशोक खरातच्या मंदिर- आश्रमात जायचे. त्याच्या डोक्यावर छत्री धरलेले "राज्य महिला आयोग" अध्यक्ष रुपाली चाकणकर आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीचे फोटो "सोशल मीडिया"तून व्हायरल झाले आहेत. ह्या नराधमाला अटक करताना पोलिसांनी जे पेनड्राइव्ह जप्त केले; त्यात ५८ महिलांच्या लैंगिक शोषणाचा मुद्देमाल सापडलाय. तोही त्याचा "ऑफिस बॉय" संशयित नीरज जाधव ह्याने पैशाच्या लालसेपायी अशोक खरातला ब्लॅकमेलिंग (५ कोटी रुपये) केल्याने उघड्यावर आलाय.

त्र्यंबकेश्वर- नाशिक येथे दर १२ वर्षांनी होणाऱ्या "सिंहस्थ" कुंभमेळ्याला ३१ ऑक्टोबर २०२६ पासून प्रारंभ होत आहे. हा कुंभमेळा ४५ अमृत (शाही) स्नानांसह दीड वर्ष चालेल. त्यातील भोंदूगिरीचा हा भयानक "ट्रीझर" ज्योतिषी अशोक खरात आणि पारनेर (जिल्हा : अहिल्यानगर) येथील १८ वर्षांच्या मुलीला तिच्या आई- वडिलांचा, भावाचा खून करण्याची धमकी देऊन गेली ५ वर्षे लैंगिक अत्याचार करणाऱ्या वारकरी बुवा हभप अण्णा गुंजाळ ह्या कीर्तनकाराने दाखवला आहे. स्वतःला संत, महंत, साधू , बुवा- महाराज आणि ज्योतिषी म्हणून घेणारी ही मंडळी एकाच माळेचे मणी आहेत. ह्या साऱ्यांचीच छिनाल छाप वेद, उपनिषद आणि पुराण कथांवर असते. सापडत नाहीत, तोपर्यंत हे "संधिसाधू"च असतात. हे तांदळातल्या खड्यांसारखे आहे. हे खडे निवडेपर्यंत तांदळाच्या पोत्यात तांदूळ म्हणूनच असतात.

असाच ज्योतिषी अशोक खरात होता. तो स्वतःला "अंकशास्त्रज्ञ" (न्यूमरोलॉजिस्ट) आणि 'कॅप्टन' म्हणवून घ्यायचा. "मर्चंट नेव्ही"मधून अधिकारी म्हणून आपण निवृत्त झाल्याचे सांगायचा. ह्या खोट्या ओळखीचा वापर करून त्याने स्वतःला बड्या राजकीय नेत्यांशी जोडून लोकांचा विश्वास संपादन केला होता. हा भोंदूगिरीचा "झंटा" आणि त्यात "मी कृष्ण, तू राधा" म्हणत होणारा महिलांच्या लैंगिक शोषणाचा "फंटा" नवा नाही. (हे "झंटा- फंटा" शब्द बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात "भाजप" आमदार सुरेश धस यांनी जोरदारपणे वापरले होते.)

आठ वर्षांपूर्वी अमरावतीतील पूर्णा नदीकाठच्या नृसिंह मठाचा प्रमुख "बालयोगी ब्रह्मचारी महाराज"

(मूळनाव : मुरलीधर तायडे) सेक्स- सीडीमध्ये सापडला होता. त्याने बाथरूमचा "भोगखाना" बनवला होता. अशा "लिंगपिसाट" महाराजांपैकी कोल्हापूरचा तोडकर महाराज रंगेहाथ पब्लिकच्या तावडीत सापडला होता. (जानेवारी २००५) शिवलिंग महादेव तोडकर हा "महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ" (एमएसईबी)मध्ये कारकून होता. त्याची भविष्य कथनाची पद्धत अंकाशास्त्राशी संबंधित नसली तरी आकड्यांशी होती. त्याच्या येणाऱ्या गिऱ्हाईकाने जन्मकुंडली स्वतःच्या हातात ठेवायची. त्याला तोडकर महाराज एक संख्या मनात घडण्यास सांगे. ती धरल्याचे गिऱ्हाईकाने सांगितले की, तोडकर महाराज त्या संख्येतून १७ वजा करण्यास सांगायचा. त्यानंतर येणाऱ्या संख्येला ९ ने गुणायचे. जो गुणाकार यायचा; तो आकडा गिऱ्हाईकाने सांगताच, तोडकर महाराज म्हणायचा, "तीच तुझी जन्मतारीख !" अशाच प्रकारे मुंबईतील कुर्ला येथील कर्वे गुरुजी आणि त्यांची मुलगी पिंकी, हे केवळ चेहरा पाहून भविष्य विचारायला येणाऱ्याची जन्मतारीख सांगत. अर्थात, ही पहिल्याच झटक्यात गिऱ्हाईक पक्कं करण्याची ट्रिक होती. ह्या जोरावर तोडकर महाराजने प्रचंड माया जमवली. वीज मंडळाच्या कारकुनाला ज्योतिष विचारायला वीजमंत्री यायचा.

कोल्हापुरात कोणी बडा राजकीय नेता, कलावंत, प्रशासकीय अधिकारी आला की, त्यांना महाराजांचे चमचे- नमते महाराजांच्या सिद्धी-चमत्काराच्या करामती ऐकवून त्यास गंजीमाळ परिसरातील "द्रोणागिरी" आश्रमात नेत. त्यापैकी काहींना तोडकर पदव्या- उपाध्या देऊन आपले करीत. अशाप्रकारे गळाला लागलेले भक्त तोडकर महाराजाला आपल्या संस्था- संघटनेच्या कार्यक्रमासाठी मुंबई- पुण्याला नेत. त्यावेळी महाराजांबरोबर विमानातून जाण्यासाठी बड्या- श्रीमंत भक्तांमध्ये चढाओढ लागायची. या साऱ्या बनावामुळे तोडकर महाराज कोल्हापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचे मानचिन्ह झाला होता. परंतु, वसई- भाईंदर येथून भविष्य समजून घेण्यासाठी कोल्हापुरात आलेल्या दोन तरुणींनी आश्रमातल्या "खास खोली"तील तोडकर महाराजाचे अश्लील उद्योग जगजाहीर केले. त्याची पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. त्यातून कोल्हापुरात तोडकर महाराजाविरोधात लोकांदोलन उभे राहिलं. पोलीस त्याला जामिनासाठी कोर्टात नेत असताना, लोकांनी चपलेनं बडवलं. ब्रह्मचारी हनुमंताच्या आडोशाने लैंगिक खेळ खेळणाऱ्या तोडकर महाराजचं थोबाड हुप्प्या वानर दिसावा, इतकं सुजवलं. त्याच्या केसचा निकाल तो मरेपर्यंत (५ फेब्रुवारी २०१५) लागला नाही. त्याचा मात्र आश्रम अजूनही आहे.

१९९१ मध्ये नागपुरातील एका भक्ताच्या मुलीवर बलात्कार करणारा कृपाळू महाराज, त्या गुन्ह्याबद्दल ७ वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर आला आणि "आस्था" आणि "संस्कार" टीव्ही चॅनलवरून प्रवचनं देऊ लागला. अंगावर जिवंत साप घेऊन "नागीन डान्स"साठी प्रसिद्ध असणाऱ्या स्वामी भीमानंद ह्याला प्रवचनाला येणाऱ्या मुलींना "सेक्स रॅकेट"मध्ये फसवल्याच्या आरोपाखाली (२०१० मध्ये) अटक झाली होती. बंगळूरचा स्वामी नित्यानंद यालाही तमिळ अभिनेत्री बरोबरचा सेक्स व्हिडिओ "लीक" केला म्हणून पोलिसांनी अटक केली होती. अशाचप्रकारे दोन मुलींवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली आसाराम बापू जेलबंद झाला. (२०१३) सोबत, त्याचा मुलगा नारायण साई हादेखील सुरतमधील दोन मुलींवर (दोघी बहिणी होत्या.) बलात्कार केल्याच्या आरोपाखाली जेलबंद झाला. तरीही आसाराम बापूच्या देशभरातील शेकडो आश्रमांपैकी एकाचीही वीट हलली नाही. ह्या नाकर्तेपणाची पैदास "जे जे होईल, ते पहावे; चर्चा करावी आणि गप्प बसावे," या सामाजिक षंढपणातून झाली आहे.

३५ वर्षांपूर्वी धुळ्याचे भास्कर वाघ प्रकरण गाजलं होतं. तोही तोडकर महाराजांसारखा सरकारी कारकून होता. त्याने महाराज बनून सरकारी तिजोरीतील १४ कोटी रुपये लंपास केले होते. विशेष म्हणजे, तेव्हा भ्रष्टाचारविरोधी प्रशासकीय अधिकारी (कर) अशी ख्याती असलेले सदाशिवराव तिनईकर हे ह्या लफंग्या महाराजांचे भक्त होते. असा इतिहास असेल, तर नटण्या- दिसण्यासाठीच अधिक प्रसिद्ध असणाऱ्या रुपाली चाकणकर आणि ज्योतिषी अशोक खरात ह्यांच्या कनेक्शनचे काय घेऊन बसलात! तरीही, कथित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात यांच्या प्रकरणाला वाचा फुटल्यावर "महाराष्ट्र राज्य महिला आयोग"च्या अध्यक्ष रुपाली चाकणकर ह्यांचे नाव विशेष चर्चेला आलं. त्यांच्या राजीनाम्याची मागणी होऊ लागली. कारण रुपाली चाकणकर यांनी "गुरुमाऊली" मानलेल्या खरात ह्याचे कारनामे महिलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आहेत.

"सोशल मीडिया"वर प्रसारित झालेल्या एका व्हिडिओमध्ये रुपाली चाकणकर नराधम खरातचा गौरव करताना म्हणतात, "आईने मला जन्म दिला म्हणून, आई माझी गुरू! वडिलांनी मला शिक्षणाची योग्य संधी दिली, म्हणून ते माझे गुरू! पण मी कोण? माझा जन्म कशासाठी आहे? मी काय काम केलं पाहिजे? ह्याचं मार्गदर्शन अशोक खरात यांनी केल्याने, माझं सारं अस्तित्व हे गुरुमाऊली हेच आहेत !" आपल्या ह्या अंधभक्तीमुळे शेकडो मुली- महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त झालीत, ह्याचे भान चाकणकर बाईंना आता तरी आले आहे का? "लोक अशांकडे श्रद्धेने जातात. तशाच प्रकारे रुपाली चाकणकर गेल्या असतील," अशी सारवासारव नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी केलीय. ती खोटी आहे. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात –

एथ वडील जें जें करिती।
तया नाम धर्मु ठेविती।
तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ॥
(ज्ञानेश्वरी, अध्याय ३, ओवी १५८)

अर्थात, "थोर लोक (नामवंत, मान्यवर) जे कर्म आचरतात; त्यालाच सामान्य लोक "धर्म" म्हणत त्याचे आचरण करतात." ह्यातून मान्यवर, सेलिब्रिटी, शासक, प्रशासक ह्याचं आचरण/ वर्तन कसे आणि कोणत्या प्रतीचे असावे, ते सांगितले आहे. ह्या अपेक्षेस पात्र नसल्याचे रुपाली चाकणकर यांनी डॉ. संपदा मुंडे आणि वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात यापूर्वीच दाखवून दिलेय. आता तर त्यांची अंधभक्ती ही बोगस कॅप्टन व लंपट ज्योतिषी असलेल्या अशोक खरात याच्या बदकर्मी उद्योगाची मार्केटिंग करणारी ठरलीय. अशोक खरातच्या शिष्या आणि त्याच्या "श्री शिवालिक संस्था"च्या विश्वस्त असलेल्या रुपाली चाकणकर आता पीडित महिलांना कोणत्या तोंडाने काय न्याय देणार? आणि भटभिक्षुकांच्या पौरोहित्याप्रमाणेच ज्योतिषाला शैक्षणिक दर्जा देणारे सरकार कोणत्या तोंडाने अशोक खरातला शिक्षा करणार? चाकणकर बाईंनी "राज्य महिला आयोग" अध्यक्ष पदाचा राजीनामा दिलाय. हे ज्योतिषाच्या भाषेत गंडांतर असले तरी प्रत्यक्षात ते बदकर्माच्या साथीदारीचे फळ आहे.

ज्योतिष किंवा भविष्यकथन हे थोतांड असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. २० दिवसांपूर्वी इस्राएल- इराण युद्ध सुरू झालंय. त्याच वेळी दुबईत ज्योतिष्यांची परिषद होती. युद्धामुळे आखातातील विमान वाहतूक थांबल्याने ज्योतिषी दुबईत अडकून पडले. तिथल्या युद्धजन्य परिस्थितीतून सुटका करून घेण्यासाठी प्रत्येक ज्योतिषी आपल्या देशाच्या- राज्याच्या शासक – प्रशासकांकडे मदतीसाठी फोन करू लागला. यातून, "ज्यांना आपल्या भविष्यात काय वाढून ठेवले ते समजत नाही; ते इतरांचे भविष्य काय सांगणार," (पान 2 वर..)

डि.के. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेतर्फे 1 मे रोजी सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच गौतम बुद्ध जयंती व वैशाखी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर डि.के. मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे यंदा १ मे रोजी सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे हा सोहळा यंदा २१व्या वर्षात पदार्पण करत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील कुटुंबांसाठी मोठा आधार ठरत आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष 'समाजभूषण' व 'भिमयोध्दा' दशरथ कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत. 'सामाजिक कार्य हाच आमचा संकल्प' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून समाजातील गरजू कुटुंबांना विवाहासारख्या मोठ्या खर्चिक विधीतून दिलासा देण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे.

आजच्या वाढत्या महागाईच्या आणि दुष्काळजन्य परिस्थितीत सर्वसामान्य कुटुंबांना मुला-मुलींचे विवाह करताना मोठ्या प्रमाणावर कर्ज घ्यावे लागते. अनेक वेळा हे कर्ज आयुष्यभराचा बोजा बनते. या पार्श्वभूमीवर सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून कुटुंबांवरील आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे दशरथ कसबे यांनी स्पष्ट केले. समाजातील कोणत्याही घटकावर कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येसारखी वेळ येऊ नये, तसेच प्रत्येक व्यक्तीने सन्मानाने जगावे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

मुकुंद नगर जयंती उत्सव मंडळ, तथागत बुद्ध विहार समिती तसेच परिसरातील माता-भगिनी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सहकार्याने हा सोहळा दरवर्षी यशस्वीरित्या पार पडत आहे. सर्व जाती-धर्मातील नागरिकांचा सहभाग हा या उपक्रमाचा विशेष वैशिष्ट्य ठरला आहे.

या सामुदायिक विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या नववधू-वरांना संस्थेच्यावतीने विविध वस्तूंचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. नवऱ्यासाठी विधीचे पांढरे कपडे व सूट देण्यात येणार असून, नवरीसाठी पांढरी साडी, शालू, अडीच ग्रॅम मणीमंगळसूत्र तसेच पायातील जोडवे दिले जाणार आहेत. याशिवाय नवदांपत्याच्या संसारासाठी गोदरेज कपाट, दिवाण खाट, गादी, भांड्यांचा रॅक, विविध भांडी, प्रेशर कुकर आदी संसारोपयोगी साहित्यही देण्यात येणार आहे.

सोहळ्यात सहभागी सर्व पाहुण्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात येणार असून, विवाहसोहळ्याचा व्हिडिओ (सीडी) तसेच विवाह संपन्न झाल्याचे प्रमाणपत्रही वधू-वरांना देण्यात येणार आहे.

यावर्षी होणाऱ्या या भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दशरथ कसबे यांनी केले आहे.

दि. 1 एप्रिल ते 20 एप्रिल पर्यंत यासाठी इच्छुका वधू-वरांनी आपली नाव नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी नगरसेवक गौतम कसबे 97 30 30 32 03, उत्तम कसबे 88 88 48 43 75, धीरज माने 9890430942, शशिकांत शिरसट 98 50 800 841 यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन दशरथ कसबे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस किरण डोळसे, भालचंद्र साखरे, शशिकांत शिरसट, बापूसाहेब सदाफुले, संजीव माने, खंडू वाघमारे, संघरक्षित बनसोडे, संदीप भालेराव, बुद्धप्रकाश कसबे आदी उपस्थित होते.

भटक्या-विमुक्तांची स्वतंत्र जनगणना न केल्यास तीव्र आंदोलन

काँग्रेस व्हीजेएनटी विभागाच्या प्रदेश अध्यक्ष ॲड.पल्लवी रेणके यांचा इशारा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- केंद्र सरकारने भटक्या-विमुक्तांची स्वतंत्र जनगणना करावी, भटक्या विमुक्तांसाठी जनगणनेमध्ये डीएनटी हे स्वतंत्र कॉलम ठेवावे. या मागणीची दखल न झाल्यास तीव्र आंदोलन करणार, असा इशारा काँग्रेस व्हीजेएनटी विभागाच्या प्रदेश अध्यक्ष ॲड.पल्लवी रेणके यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिला.

होऊ घातलेल्या राष्ट्रीय जनगणनेमध्ये भटक्या-विमुक्त समाजाची स्वतंत्र जनगणना करण्यात यावी, या मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्या व्हीजेएनटी विभागाने लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत स्वतंत्र जनगणनेचा प्रश्न संसदेत मांडण्याची ठोस मागणी करण्यात आली. केंद्र शासनाने १८ ऑगस्ट २०२० रोजी सर्व राज्यांना शहर, खेडी तसेच दुर्गम- अती दुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या भटक्या-विमुक्तांचे घर ते घर सर्वेक्षण करण्याचे स्पष्ट लेखी निर्देश दिले होते. मात्र, केंद्र व राज्यात भाजपचे सरकार असतानाही आजपर्यंत या निर्देशांची अंमलबजावणी झालेली नाही. हा भटक्या-विमुक्त समाजावर झालेला गंभीर अन्याय आहे, असे ॲड. पल्लवी रेणके म्हणाल्या.

या संदर्भात लवकरच जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन केंद्र सरकारला देशातील सुमारे २५ कोटी भटक्या-विमुक्तांसाठी जनगणनेत स्वतंत्र कॉलम व कोड देण्याची मागणी करणारे निवेदन सादर करण्यात येणार आहे. यामुळे या प्रवगार्ची वास्तविक लोकसंख्या तसेच आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थितीची अचूक माहिती उपलब्ध होऊन त्यांना स्थिरता, शिक्षण, नोकरी आणि प्रतिष्ठेचा समान अधिकार मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.महाराष्ट्राच्या सध्याच्या अर्थसंकल्पात भटक्या-विमुक्तांसाठी कोणतीही ठोस आर्थिक तरतूद करण्यात आलेली नसल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

सरकारी नोकऱ्यांमधील संधीही नाकारल्या जात आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागाने अलीकडेच ११४० रिक्त पदांसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत भटक्या-विमुक्तांसाठी असलेले ११ टक्के आरक्षण पूर्णपणे डावलण्यात आले. ज्या ठिकाणी १५८ पदे अपेक्षित होती, तेथे एकही जागा न दाखविल्याने आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही.

एकूणच जातनिहाय जनगणना, सर्वेक्षण, रोजगार व शासकीय नोकरीच्या संधी या सर्व स्तरांवर भटक्या-विमुक्त समाजाला सरकारद्वारा वंचित ठेवले जात आहे.या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळात राज्यभर कार्यक्रम, मोर्चे व आंदोलने आयोजित करून या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्यात येणार असल्याचे ॲड. पल्लवी रेणके यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस काँग्रेस व्हीजेएनटी विभागाचे सोलापूर शहर अध्यक्ष युवराज जाधव, प्रदेश कार्याध्यक्ष बादल गायकवाड, जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, प्रदेश सचिव-भिमराव बंडगर, शहर कार्याध्यक्ष प्रकाश माने, शहर संघटक संजय गायकवाड, कमल चव्हाण आदी उपस्थित होते.

अजित पवारांच्या प्रकरणात महाराष्ट्रात FIR घेईनात

रोहित पवारांनी थेट कर्नाटकात केली तक्रार दाखल

मुंबई (कटूसत्य वृत्त):- बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी आमदार रोहित पवार यांच्याकडून बेंगळुरू येथे 'झीरो एफआयआर' दाखल करण्यात आली आहे. हा अपघात नसून, घातपात होता, असा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला

आहे. दरम्यान, हा गुन्हा आता बारामती पोलिसांकडे वर्ग होईल.

मुंबईहून २८ जानेवारीला बारामतीकडे जाणारे खासगी 'लिअरजेट ४५' विमान बारामती विमानतळाजवळ कोसळले होते. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पायलट, सहपायलट आणि अन्य कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता.

रोहित पवार यांनी यापूर्वी मुंबईतील मरिन ड्राइव्ह पोलिस ठाणे आणि बारामती पोलिसांकडे तक्रार देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, एफआयआर नोंदवली गेली नाही. पुणे सीआयडीकडून केवळ 'ॲक्सिडेंटल डेथ'च्या दृष्टीने तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर अखेर कर्नाटकातील (पान 2 वर..)

संपादकीय

महायुतीतील सत्तासंघर्ष चव्हाट्यावर

शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांना बाजूला सारत भाजपने ज्या पद्धतीने साताऱ्यात मुसंडी मारली, त्याने युतीमधील अंतर्गत कलह आता थेट विधान परिषदेच्या पटलावर आला आहे.महायुतीतील महामतभेद उघड होऊ लागले आहेत. कोणत्याही युतीला कुरघोडीचे ग्रहण लागतेच. तसे ते लागले, अगदी झपाट्याने. विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना 'विरोधक गेले तरी कुठे' असा प्रश्न होता. तो तसाच असताना आज सत्ताधीयांनी विरोधकांची उणीव भरून काढायचे प्रयत्न केले आणि ते यशस्वीही झाले. निमित्त होते सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजितदादा गट या दोघांच्या एकत्रित शक्तीवर भाजपने केलेल्या कुरघोडीचे. तो विषय आज विधान परिषदेत गाजला आणि युतीतील सत्ता स्पर्धेचे दर्शन घडवून गेला. खरे तर विरोधकांनी ज्या घटनांवर बोट ठेवायला पाहिजे, त्याकडे त्यांचे लक्ष नसताना आता सत्ताधारी पक्ष एकमेकांच्या विरोधात सक्रिय झाले आहेत. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीचा वाद चव्हाट्यावर आला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील नगरपालिका, महानगरपालिकांचे निकाल युतीला कौल देणारे असले तरी जिल्हा परिषदेत मात्र प्रचंड चुरस सत्ताधारी पक्षातच होती. अजित पवार यांच्या निधनानंतर या निवडणुका झाल्या. त्यामुळे कुठेतरी राष्ट्रवादीला सहानुभूतीचा लाभ होईल असेही वाटत होते. प्रत्यक्षात भाजपने स्वतःच्या बळावर आजवर फारशी ताकद नसलेल्या जिल्ह्यात मुसंडी मारली. कधी शिंदे सेनेच्या बरोबर तर कधी स्वबळावर. छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यामध्ये ताकद समान झाली. भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात काहीतरी वाद होतील, जिल्हा परिषद अध्यक्ष नक्की कोणाकडे जाईल असा प्रश्न होता. प्रत्यक्षात छत्रपती संभाजीनगरचा प्रश्न कोणताही वाद न होता मिटला. रायगड जिल्हा परिषदेमध्ये सत्तापक्षात भाजपच्या सर्वात कमी जागा आल्या असल्या तरी एकेकाळच्या बलाढ्य शेकापच्या गडात भाजपने आपला सदस्य जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून खुर्चीवर बसवला. ही लढत किंवा ही तडजोड कशी काय घडली हा चचेर्चा विषय असतानाच गेल्या आठवड्यात अचानक साताऱ्यातील अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून रणकंदन माजले. साताऱ्यात जे झाले ते लोकशाहीची तत्त्वे धाब्यावर बसवणारे. सत्तेतील पक्ष यंत्रणेचा वापर करून भांडत बसले. महेश शिंदे हे सातारा जिल्ह्यातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार. त्यांच्या पत्नी प्रिया शिंदे या भाजपतर्फे निवडणूक रिंगणात उतरल्या. त्या विजयी झाल्या. त्यानंतर राष्ट्रवादी अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांची निवडणूकपूर्व युती असली तरी भाजपने काहीशा जास्त जागा जिंकल्याने या युतीवर मात करत अध्यक्षपद आपल्या हाती असायला हवे, असे भाजपला वाटू लागले. मोठ्या भावाला युतीत त्याग करावा लागतो. मात्र सांगली जिल्ह्यातही भाजप आणि शिवसेना शिंदे गटात कुरापती आणि कुरबुरी झाल्यामुळे तो हिशेब चुकवण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेची निवडणूक अत्यंत गंभीरपणे घ्यायची, असे ठरले असे म्हणतात. यातले काय ठरले आणि खरे काय या तपशील स्थानिक पातळीवरचे राजकारण लक्षात घेता तसे अनावश्यक. पण छोट्या गोष्टीनेच मोठ्या वादांना सुरुवात होत असते हे लक्षात घेता हे तपशील जाणून घ्यायला हवेत.भाजपने सातारा जिल्हा परिषदेवर आपला उमेदवार अध्यक्ष व्हावा यासाठी अत्यंत आक्रमकपणे आखणी सुरू केली. या आखणीतून काही सदस्यांना मतदानापर्यंत पोहोचूच द्यायचे नाही, त्यांना एखाद्या ठिकाणी दडवून ठेवायचे यापासून तर ऐनवेळी पक्ष फोडायचे या पर्यंतचे सर्व काही ठरले. साम-दाम-दंड-भेद दोन्ही बाजूंनी वापरले गेले. आता सर्वच पक्ष असे मार्ग अमलात आणत असल्यामुळे कोणालाही अन्य कोणी उपदेश करायचा अधिकारच राहिलेला नाही. मात्र हे झाल्यानंतर पालकमंत्री असलेल्या शंभूराज देसाई यांना तिथे नगण्य ठरवले गेल्यामुळे ते व्यथित झाले आणि संतापले. पालकमंत्र्याला पोलिसांनी मारहाण केली असे आरोप गेल्या दोन दिवसांपासून सुरू आहेत. मात्र तपशिलाचा हा भाग सोडला तरी निवडणूक प्रक्रियेमध्ये कुणालाही हस्तक्षेप करता येत नाही, तिथे जाऊन उभे राहता येत नाही. तरीही मंत्री तिथे गेले कसे काय, त्यांच्या गाड्यांना परवानगी का मिळाली, निवडणूक प्रक्रियेवर प्रभाव टाकायचा प्रयत्न सुरू होता का, असे अनेक प्रश्न यातून उपस्थित झाले. भाजपने सदस्य फोडले आणि शिवसेना शिंदे गटाने कायदा हातात घेतला. दोघांचेही चुकले. त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस विलीनीकरण झाले नसले तरी सातायात एकत्र असल्यामुळे त्यांच्या मनातील भाजप द्वेषही यावेळी उफाळून आला. युतीतील दोन सहकारी विरुद्ध भाजप असा सामना रंगला. त्यात भाजपने मात केल्यामुळे संतापलेल्या आणि उद्विग्न झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांनी आज विधान परिषदेचे कामकाज सुरू होताच विशेष सत्र काळात सातारा जिल्ह्यातील पोलिस अधीक्षकांना निलंबित करण्याच्या हालचाली केल्या. आता मुळात प्रशासकीय अधिकार्यांचे निलंबन विधिमंडळ करू शकते का, हा एक मुद्दा. गेल्या आठवड्यात युतीतील बेबनावामुळेच प्रदूषण नियंत्रण मंडळातील अधिकार्यांवर अशी वेळ आली होती. आज सातारा जिल्हा पोलिस अधीक्षकांचा क्रमांक लागला. या संदर्भात दिलेले निर्देश पाळले जातील काय, त्याबद्दल कायदेशीर तरतूद काय, अधिकाऱ्याचे निलंबन योग्य की अयोग्य, याबद्दल चर्चा होईल. मात्र सध्या युतीतील दोन सहकारी पक्ष परस्परांना सहकार्य न करता एकमेकांवर कुरघोडीचे राजकारण करत असल्याची वस्तुस्थिती जगासमोर आली.एकनाथ शिंदे आणि रवींद्र चव्हाण यांच्या दिल्लीवारीचीही पार्श्वभूमी या प्रकरणाला आहे. अधिवेशन चालू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीत गेले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटले. ते कशासाठी गेले होते, त्यांना भाजपच्या स्थानिक नेतृत्वाबाबत तक्रारी करायच्या होत्या काय, असे मुद्दे चर्चेत आहेत. शिंदे परत येतात न येतात तोच रवींद्र चव्हाण हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेटायला दिल्लीला गेले. शिंदे यांना यावेळी शहा भेटले नव्हते. रवींद्र चव्हाण यांना ते भेटले. पाच राज्यांच्या निवडणुकीच्या धकाधकीतही ही भेट झाली. त्यात परस्परांच्या विरोधातल्या तक्रारी झाल्या की राज्याला पुढे न्यायचे नियोजन झाले, हे कळायला मार्ग नाही. पण ज्या पद्धतीने सातारा प्रकरण गाजले आणि थेट विधान भवनात त्याचे पडसाद उमटले, त्यावरून युतीतील दोन्ही पक्षांमध्ये फारसे आलबेल नसल्याचे वास्तव समोर आले. महाराष्ट्रातील जनतेने युतीला एकहाती सत्ता दिली आहे. दृष्ट लागणारे बहुमत मिळाले असताना परस्परांना जखमी करत जाण्याचा हा प्रकार दर्शवतो तरी काय? युतीतील हा बेबनाव राज्याच्या हिताचा नाही, याचे स्मरण राज्यकर्त्यांनी ठेवले तर बरे होईल.

श्रद्धा, शासन आणि पारदर्शकतेचा प्रश्न

देवेंद्र फडणवीस २०१८ साली मुख्यमंत्री असताना कॅप्टन फाईल्स, भोंदू अशोक खरात याच्या बेकायदेशीर देवस्थानाला कोट्यवधींचा निधी दिल्याचे माहिती अधिकारातून उघड झाल्याने खरातचा खरा आका फडणवीस व भाजपच असल्याचा आरोप विरोधक सोशल मीडियावरून करत आहेत.'सिद्धक्षेत्र' की सत्तेचा संरक्षणकवच? ईशानेश्वर प्रकरणातील अनुत्तरित प्रश्न. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर देवस्थानासाठी राज्य शासनाने मंजूर केलेल्या तब्बल १ कोटी ५ लाख रुपयांच्या निधीने अनेक गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहेत. माहिती अधिकारातून उघड झालेल्या या निर्णयानुसार, २०१८ सालीच २५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सभामंडप, भक्तनिवास, चेंजिंग रूम, पार्किंग आणि सुशोभीकरण यांसारख्या सुविधांसाठी हा निधी खर्च होणार होता. पण या निर्णयामागील प्रक्रिया, पात्रता आणि पारदर्शकता यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणातील सर्वात वादग्रस्त बाब म्हणजे या देवस्थानाला शासकीय कागदोपत्री ह्यसिद्धक्षेत्रह्ण असा दर्जा देण्यात आल्याचे समोर येते. एखाद्या धार्मिक स्थळाला असा दर्जा देण्यासाठी कोणते निकष असतात? त्यासाठी ऐतिहासिक, सांस्कृतिक किंवा आध्यात्मिक मूल्यांची कोणती शासकीय पडताळणी होते? या संदर्भात शासनाने स्पष्ट धोरण जाहीर केलेले नाही. त्यामुळे हा दर्जा देताना नेमकी कोणती प्रक्रिया राबवली गेली, याचा उलगडा होणे अत्यावश्यक आहे. याहूनही गंभीर मुद्दा म्हणजे या प्रस्तावाची वाटचाल. स्थानिक पातळीवरून हा प्रस्ताव शासनापर्यंत पोहोचला कसा? कोणत्या लोकप्रतिनिधींनी किंवा अधिकाऱ्यांनी त्याला गती दिली? त्या काळात राज्यात यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत होते. त्यामुळे त्या काळातील संबंधित मंत्री, सचिव आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची भूमिका तपासणे गरजेचे ठरते. निर्णय प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा सार्वजनिक होणे हीच लोकशाहीची अपेक्षा आहे. सध्याच्या राजकीय वातावरणात या प्रकरणाला अधिकच धार आली आहे. एकीकडे विरोधकांकडून आरोप होत आहेत की संबंधित व्यक्तींना सत्तेचे संरक्षण मिळाले, तर दुसरीकडे सत्ताधाऱ्यांकडून वेगवेगळे दावे केले जात आहेत. यांच्या कार्यकाळात मंदिरासाठी रस्ता, पाणी अशा सुविधा दिल्याच्या चर्चा आहेत. तसेच काही माजी पदाधिकाऱ्यांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. मात्र या सर्व आरोप-प्रत्यारोपांमध्ये मूळ मुद्दा हरवू नये. तो म्हणजे सार्वजनिक निधीचा वापर आणि त्यामागील वैधता. भोंदू बाबा अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय याची खात्री पटावी अशी परिस्थिती सध्या आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे खरातने मंदिरासाठी रस्त्याची मागणी केली आणि ती पूर्ण देखील झाली. मंत्रिमंडळ उप समितीने पाणी दिले, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पदावर असताना आणि त्याचे "गुण" माहीत असूनही त्याचे उदात्तीकरण केलं,त्याची दुष्कृत्ये माहीत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले,त्याच्याकडे जास्तीत जास्त लोक आकर्षित होतील याची काळजी घेतली. महसूल विभागाने जमीन विषयक कायद्याकडे दुर्लक्ष केले. शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी तर कहर केला, अशोक खरातला अस्ट्रॉनॉमीचं चांगलं ज्ञान असल्याने आपण त्याच्याकडे ज्योतिष बघण्यासाठी जात होतो असं त्यांचं म्हणणं आहे.ज्या शिक्षण मंत्र्याला अस्ट्रॉनॉमी आणि अस्ट्रॉलॉजी यांच्यातला फरक कळत नाही त्यांच्याकडून काय वेगळी अपेक्षा करणार?. खरातशी अनेक अधिकाऱ्यांनी आर्थिक संबंध ठेवलेले आहेत.त्यातील एक अधिकारी अभिजीत भांडे पाटील याचे खरात बरोबरचे संबंध पुढे आले.या अभिजीत भांडे पाटलावर शेकडो कोटी रुपयांची काळीमाया जमा केल्याचा आरोप आहे आणि त्यासंदर्भात २०२४ मध्ये विधानसभेत लक्षवेधी देखील मांडण्यात आली होती. परंतु पुढे काहीच झालं नाही, अर्थात ते होणारच नव्हतं.भोंदू खरात आणि त्याच्या चरणी लोळण घेणारे मंत्री आणि अधिकारी पाठीशी असल्यावर काय होणार? असे अनेक अधिकारी आणि मंत्री भोंदू बाबाच्या चरणी लोळण घेत होते.अनेक आयएएस अधिकारीही त्याच्या सेवेत होते. महाराष्ट्राचा एपस्टीन अशोक खरातच्या मुलीबरोबर जमिनीची भागीदारी करणाऱ्या महिलेचा पती अभिजीत भांडे पाटील, उपजिल्हाधिकारी ! आहेत असा दावा विरोधक करतात. त्याच्या पत्नीच्या नावावर कंपन्या, रिअल इस्टेट फर्म्स, स्टार्टअप- आणि उघड भागीदारी. हे धाडस कुठून येतं? स्पष्ट आहे सत्तेचा पाठिंबा असल्यानेच. शिक्षण क्षेत्राशी संबंधित विधानांमुळेही या प्रकरणाने वेगळे वळण घेतले आहे. यांनी केलेल्या विधानांमुळे 'ॲस्ट्रॉनॉमी' आणि 'ॲस्ट्रॉलॉजी' यांतील फरकासारख्या मूलभूत गोष्टींचाही सार्वजनिक चर्चेत समावेश झाला. हे केवळ व्यक्तीगत मतप्रदर्शन नसून, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि सार्वजनिक पदावरील जबाबदारी यांच्यातील तफावत अधोरेखित करणारे आहे. दरम्यान, काही अधिकाऱ्यांवर आर्थिक गैरव्यवहार आणि संशयास्पद संबंधांचे आरोपही समोर आले आहेत. २०२४ मध्ये विधानसभेत लक्षवेधीद्वारे हे मुद्दे उपस्थित झाले होते, पण त्यानंतर ठोस कारवाई झाल्याचे चित्र दिसत नाही. यामुळेच शंका अधिक गडद होते प्रकरण दाबले जात आहे का? या सर्व पार्श्वभूमीवर काही मूलभूत प्रश्न अनुत्तरित राहतातः सार्वजनिक निधी धार्मिक संस्थांना देण्याचे निकष काय? संबंधित संस्थेची कायदेशीर स्थिती आणि जमिनीचे स्वरूप तपासले गेले का? निर्णय प्रक्रियेत कोणती पारदर्शकता ठेवली गेली? आरोप झाल्यानंतर स्वतंत्र चौकशी का जाहीर झाली नाही? लोकशाहीत श्रद्धा आणि शासन यांच्यात स्पष्ट भिंत असणे आवश्यक असते. श्रद्धा ही वैयक्तिक बाब आहे; पण शासनाचा प्रत्येक निर्णय सार्वजनिक आणि उत्तरदायी असावा लागतो. अन्यथा 'सिद्धक्षेत्र' ही संकल्पना विकासापेक्षा राजकीय संरक्षणाचे साधन बनण्याचा धोका निर्माण होतो. या प्रकरणात सर्वात महत्त्वाची गरज आहे ती निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशीची. शासनाने स्वतःहून या निर्णयाशी संबंधित सर्व कागदपत्रे, मंजुरी प्रक्रिया आणि जबाबदार अधिकाऱ्यांची माहिती सार्वजनिक करावी. जर कुठे गैरप्रकार झाले असतील, तर संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी. पद, पक्ष किंवा प्रभाव यांचा विचार न करता. कारण शेवटी प्रश्न केवळ एका मंदिराचा नाही; तो शासन व्यवस्थेवरील विश्वासाचा आहे. आणि तो विश्वास डळमळीत झाला, तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागते.

सम्राट अशोक : धर्म, न्याय आणि मानवतेचा दीपस्तंभ

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि शासकांनी आपापल्या कायार्ची अमिट छाप सोडली आहे; परंतु ज्यांनी केवळ राज्यकारभारात यश मिळवले नाही, तर मानवी मूल्यांचा, नैतिकतेचा आणि शांततेचा मार्ग स्वीकारून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श निर्माण केला, अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये सम्राट अशोक यांचे स्थान सर्वोच्च मानले जाते. सम्राट अशोक यांची जयंती ही केवळ एका राजाची आठवण नसून, ती मानवी जीवनातील परिवर्तन, आत्मपरीक्षण आणि धर्माधिष्ठित शासनव्यवस्थेची प्रेरणा देणारी एक महान घटना आहे. सम्राट अशोक हे मौर्य साम्राज्याचे तिसरे सम्राट होते. त्यांचा जन्म इ.स.पूर्व ३०४ च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील सम्राट बिंदुसार आणि आजोबा चंद्रगुप्त मौर्य होते. चंद्रगुप्त मौर्य यांनी स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्याचा विस्तार आणि सुदृढीकरण करण्याचे महान कार्य अशोकांनी केले. बालपणापासूनच अशोक हे बुद्धिमान, पराक्रमी आणि धाडसी होते. त्यांना युद्धकलेत प्रावीण्य होते आणि राज्यकारभाराची उत्तम समज होती. त्यामुळेच त्यांच्या वडिलांनी त्यांना विविध प्रांतांचे राज्यपाल म्हणून नेमले होते. तक्षशिला आणि उज्जैनसारख्या महत्त्वाच्या प्रांतांचे प्रशासन त्यांनी कुशलतेने सांभाळले.

राजसिंहासनावर आरूढ झाल्यानंतर सम्राट अशोकांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अनेक मोहिमा केल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची आणि ऐतिहासिकदृष्ट्या निर्णायक ठरलेली मोहिम म्हणजे कलिंग युद्ध. इ.स.पूर्व २६१ मध्ये झालेल्या या युद्धात अशोकांनी विजय मिळवला; परंतु या विजयाची किंमत अत्यंत भीषण होती. हजारो सैनिक आणि निरपराध नागरिक मारले गेले, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, आणि संपूर्ण प्रदेशात हाहाकार माजला. या युद्धानंतर अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. रणांगणावर पडलेल्या मृतदेहांचे दृश्य, विधवा झालेल्या स्त्रियांचा आक्रोश आणि अनाथ मुलांचे दुःख पाहून अशोकांच्या अंतःकरणात प्रचंड वेदना निर्माण झाली. याच क्षणापासून अशोकांच्या जीवनात एक महान परिवर्तन घडले. त्यांनी युद्ध आणि हिंसेचा मार्ग सोडून धर्म, अहिंसा आणि करुणेचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि 'धम्म' या संकल्पनेचा प्रसार सुरू केला. अशोकांचा 'धम्म' हा केवळ धार्मिक आचार-विचारांपुरता मर्यादित नव्हता, तर तो नैतिक जीवनपद्धतीचा मार्ग होता. सत्य, अहिंसा, करुणा, दया, सहिष्णुता, प्रामाणिकपणा आणि सर्व जीवांप्रती आदर या मूल्यांचा त्यांनी प्रचार केला.

सम्राट अशोकांनी आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी आपल्या राज्यभर शिलालेख आणि स्तंभ उभारले, ज्यांवर धम्माचे उपदेश कोरलेले होते. हे शिलालेख आजही भारताच्या विविध भागांत आढळतात आणि अशोकांच्या विचारांचा जिवंत पुरावा म्हणून उभे आहेत. त्यांनी 'धम्म महामात्र' या अधिकाऱ्यांची नेमणूक केली, ज्यांचे काम लोकांमध्ये नैतिकता आणि सदाचार यांचा प्रसार करणे होते. अशोकांनी आपल्या प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांनी रस्त्यांच्या कडेला झाडे लावली, विहिरी आणि धर्मशाळा बांधल्या, प्राण्यांसाठी आणि माणसांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली. सम्राट अशोकांची शासनपद्धती अत्यंत प्रगत आणि लोकाभिमुख होती. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आदर्श ठेवला आणि सर्व धर्मांना समान आदर दिला. त्यांनी कोणत्याही एका धर्माला प्राधान्य न देता सर्वांच्या श्रद्धांचा सन्मान केला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार हा केवळ सत्ता चालवण्याचा मार्ग नव्हता, तर तो जनतेच्या कल्याणासाठी असलेली एक जबाबदारी होती. त्यांनी न्यायव्यवस्था सुधारली आणि लोकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी विशेष यंत्रणा निर्माण केली.

अशोकांनी बौद्ध धर्माचा प्रसार केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही, तर त्यांनी त्याचा प्रसार जगभर केला. त्यांनी आपल्या पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले, जिथे त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार केला. तसेच त्यांनी इतर देशांमध्येही धम्मदूत पाठवले. यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार आशिया खंडातील अनेक देशांमध्ये झाला. अशोकांच्या या प्रयत्नांमुळे भारताला 'शांततेचा संदेश देणारा देश' म्हणून ओळख मिळाली.

सम्राट अशोकांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजही जाणवतो. भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र हे त्यांच्या विचारांचे प्रतीक आहे. हे चक्र सत्य, न्याय आणि प्रगतीचा मार्ग दर्शवते. तसेच भारताच्या राज्यचिन्हात असलेले सिंहस्तंभ हेही अशोकांच्या काळातील वारसा आहे. यावरून अशोकांच्या विचारांचा आणि कार्याचा भारतीय राष्ट्रजीवनावर किती खोल प्रभाव आहे, हे स्पष्ट होते.

आजच्या काळात, जेव्हा जगात हिंसा, द्वेष आणि असहिष्णुता वाढत आहे, तेव्हा सम्राट अशोकांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या जीवनातून आपल्याला हे शिकायला मिळते की, खरा विजय हा शस्त्रांच्या जोरावर मिळत नाही, तर तो मन जिंकण्याने मिळतो. अशोकांनी दाखवून दिले की, एक शासक केवळ पराक्रमी असणे पुरेसे नाही, तर तो संवेदनशील आणि नैतिकदृष्ट्या सजग असणेही आवश्यक आहे.

सम्राट अशोकांची जयंती ही केवळ ऐतिहासिक स्मरणरंजनाचा दिवस नसून, ती आत्मपरीक्षणाची आणि मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याची संधी आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपण समाजात शांतता, सौहार्द आणि न्याय प्रस्थापित करू शकतो. त्यांच्या धम्माच्या मार्गावर चालल्यास मानवजातीसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवणे शक्य आहे.

अशा या महान सम्राटाला त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे स्मरण ठेवणे आणि त्यांची अंमलबजावणी आपल्या जीवनात करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण एक सुसंस्कृत, समतामूलक आणि शांततापूर्ण समाज निर्माण करण्याचा संकल्प करूया.

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

लंपट ज्योतिषाचा राजकीय...

असा प्रश्न निर्माण झाला. अशीच हालत आता चाकणकरबाईंच्या "गुरुमाऊली"ची झालीय. तरीही त्या "ज्योतिष - भविष्य कथन हे थोतांड आहे," अशी कबुली देण्याची शक्यता नाही. कारण, पाच वर्षांपूर्वी (जानेवारी २०२१) ज्योतिष शास्त्राला शैक्षणिक प्रतिष्ठा देण्याचा निर्णय "मोदी सरकार"ने घेतलाय. त्यानुसार, 'केंद्र सरकार'च्या अखत्यारितील 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ'ने (IGNOU- इग्नू) ज्योतिषशास्त्राची 'मास्टर्स डिग्री' (MA) देणारा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू केलाय. त्यात ज्योतिषशास्त्राच्या विविध शाखांबाबतचं व्यावहारिक शिक्षण विद्यार्थ्यांना दिलं जातं. ह्या निर्णयास, "ज्योतिषशास्त्र हे अवैज्ञानिक असल्याने हा अभ्यासक्रम रद्द करावा," अशी मागणी विज्ञान प्रचार-प्रसाराचं काम करर्णाया संस्था- संघटनांनी केली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या "महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती"ने तेव्हा प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून म्हटले होते की, "ज्योतिष या विषयाला कोणताही शास्त्रीय आधार नाही. ते 'छद्म विज्ञान' आहे. ग्रह-ताऱ्यांचा शास्त्रीय अभ्यास करर्णाया विज्ञान शाखेला 'खगोलशास्त्र' म्हणतात. त्या शास्त्राच्या उपलब्ध अभ्यासानुसार, आकाशातल्या ग्रह-ताऱ्यांचा मानवी जीवनावर कोणताही प्रभाव पडत नाही; परिणाम होत नाही. त्यामुळे अशा संपूर्ण अशास्त्रीय गोष्टींचे प्रशिक्षण देण्याचा दावा करणारा 'ज्योतिष' अभ्यासक्रम रद्द करावा !" ही त्यांची मागणी योग्य आणि विज्ञान प्रसाराचा आग्रह धरणाऱ्या 'भारतीय संविधान'ला धरून होती. पण त्याची सरकारी पातळीवर दखल घेतली नाही.

अशाच प्रकारचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय २००१ मध्ये 'भाजप आघाडी' (NDA)च्या 'वाजपेयी सरकार'नेही घेतला होता. त्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाल्याने तो रद्द करण्यात आला. हा विरोध करणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ खगोल वैज्ञानिक डॉ.जयंत नारळीकर यांचाही समावेश होता. भारतीय वंशाचे 'नोबेल' पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ व्ही.के.वेंकटरामन यांनी ज्योतिषशास्त्राची तुलना 'छद्म' विज्ञानाशी (स्यूडोसायन्स) केलीय. 'छद्म' विज्ञान म्हणजे, विज्ञानासारखी मांडणी करून केलेली फसवणूक! ह्यात ज्योतिषशास्त्र 'क्रमांक एक' वर आहे; आणि ते विविध प्रकारे जगभर आहे. ह्या र्सायांचा उद्योग आकाशातल्या ग्रह-तार्यांवर असतो. त्यातही भारतीय ज्योतिष्यांनी आपली उंची वाढवण्यासाठी त्याला "भटी शेंडी" लावल्याने आकाशात नसलेले 'राहू-केतू' हे काल्पनिक ग्रह जन्मकुंडलीत आणले आहेत. ते 'कालसर्पयोग' बनून (ज्याची जन्मकुंडली तयार केली आहे त्या) जातकाला 'नारायण-नागबळी' विधीसाठीचं 'गिऱ्हाईक' बनवतात.

याशिवाय, शनीची साडेसाती, २२ कोटी किलोमीटर दूरवर असलेल्या मंगळाची 'कडक' बाधा, हातावरच्या गुरू-बुध-शुक्राचा दुबळेपणा दाखवणाऱ्या रेषा- चिन्हं- उंचवटे जाळ्या आहेत. शुभ-अशुभ दिवसाचे, मुहूर्ताचे खूळ आहे. वास्तुशास्त्र, 'नाडी'माहात्म्य, जपजाप्य- मंत्रमाहात्म्य यांचे उपाय-तोडगेही आहेत. ह्या साऱ्या बनावट उद्योगांसाठी 'मास्टर ऑफ आर्ट' ज्योतिषी बनवून 'मोदी सरकार' लोकांनी कष्टाने कमावलेल्या पैशांवर हात मारणारे खिसेकापू आणि दरोडेखोर तयार केलेत; तसेच स्त्रियांची अब्रू लुटणारेही तयार केलेत ; त्यांना प्रतिष्ठा दिलीय; हे अशोक खरातच्या प्रकरणावरून स्पष्ट होते.

छत्रपती शिवरायांच्या आणि राजमाता जिजाऊंच्या चरित्राची नटव्या-नाटकी शब्दांत विटंबना करणाऱ्या कथित 'शिवशाहीर' ब. मो. पुरंदरेंना 'महाराष्ट्रभूषण पुरस्कार' देऊन 'फडणवीस सरकार'ने त्याच्या नालायकीला 'सरकारमान्य' केले. तोच प्रकार 'मोदी सरकार'ने राष्ट्रीय विद्यापीठातून ज्योतिषशास्त्राचा 'मास्टर डिग्री'चा अभ्यास राबवून नकली विज्ञानाला 'सरकार मान्यता' देऊन केला आहे. २,००० कोटी रुपये खर्चून तयार केलेलं भारताचे चांद्रयान चंद्रावर पोहोचले नाही. "ते पोहोचणार नाही," असे भाकीत देशातील एकही ज्योतिषी करू शकला नाही. तिथे 'मोदी सरकार'ने तयार केलेले 'मास्टर्स' ज्योतिषी लोकांच्या कुंडल्या मांडून, हस्तरेषा पाहून त्यांच्यावर आकाशातल्या ग्रह-तार्यांचा प्रभाव किती पडतो, ह्याचा काय डोंबलाचा अभ्यास करणार आणि त्यांचे भविष्य सांगणार?

आई-वडील, पूर्वजांचे गुण-दोष अपत्यात उतरतात. तसे, "चंद्रसूर्यादि ग्रहांवरून येर्णाया लहरींचे ठसे गभार्तून बाहेर येताना अर्भकाच्या मृदू शरीरावर उमटतात आणि त्याच्यात काही शारीरिक व बौद्धिक दोष जन्मतःच निर्माण करतात!" ह्या गृहीतकावर ज्योतिषशास्त्राचा डोलारा उभा आहे. परंतु, चंद्रसूर्यादी ग्रह-तार्यांच्या प्रकाश-लहरींचा कोणताही परिणाम अर्भकावर होत नाही, हे विज्ञानाने सिद्ध केलंय. कारण सूर्याचा प्रकाश आपणापर्यंत आठ मिनिटांनंतर पोहोचतो. इतर ग्रह-तार्यांच्या प्रकाश-लहरी आपणापर्यंत पोहोचण्यास शेकडो वर्षे लागतात. अशा परिस्थितीत ग्रह-तार्यांचे प्रभाव-परिणाम मानवी जीवनावर कसे होणार? ते होत नाहीत, हे इयत्ता आठवीच्या पुस्तकात शिकवायचे आणि 'एमए'ला त्याच्या उलटे शिकवायचे, हा 'मोदी सरकार' पुरस्कृत उफराटेपणा आहे. त्यासाठी ज्योतिषशास्त्राचा 'देशी बाणा' दाखवला जातो; तोही खोटा आहे. कारण १२ राशी आणि जन्मकुंडलीतल्या १२ घरांत लोकांना 'गिऱ्हाईक' बनवणारं ज्योतिषशास्त्र हे 'भारतीय' नाही. १२ राशी ही 'ग्रीक कालगणना' पद्धत आहे. 'भारतीय कालगणना' ही २७ नक्षत्रांवर आधारित आहे.

राशीला आलेल्या ग्रहांचा इष्ट-अनिष्ट परिणाम अनिवार्य किंवा अटळ असतो; असे ज्योतिषीही मान्य करीत नाही. तसा इतिहास नाही. तरीही भय, अज्ञान, अगतिकता यामुळे लोक ज्योतिष्यांचे 'गिंहाईक' बनतात. अरिष्ट टाळण्यासाठी, ग्रहशांती करण्यासाठी तोडगे-विधी करतात. थोरले माधवराव पेशवे यांना क्षयरोगाने मृत्यूच्या दाढेत लोटले. त्यातून त्यांची सुटका करण्यासाठी 'मृत्युंजय' मंत्राचा गजर अखंड चालू ठेवण्यासाठी शेकडो ब्राह्मण नियुक्त केले होते. तरीही, त्यांच्या मंत्रजागराला न जुमानता मृत्यूने माधवरावांना ओढून नेले!

दुसरे महायुद्ध गाजवणारा जर्मनीचा 'हुकूमशहा' हिटलर ह्याचा ज्योतिषावर नितांत विश्वास होता. त्याने आपल्या दिमतीला पाच प्रख्यात 'ज्योतिर्भास्कर' बाळगले होते. त्यापैकी एकाला (त्याला स्वतःचेच भविष्य न समजल्यामुळे) इंग्लंडच्या हेरांनी पळवून नेले. उरलेले चौघे हिटलरला सल्ला देण्यास तत्पर होते. पण त्यांच्या सल्ल्याचा काडीमात्र उपयोग झाला नसल्याचे इतिहास सांगतो. आपला संपूर्ण पराभव होऊन शत्रूच्या हातात सापडण्याची नामुष्की टळावी, यासाठी हिटल

छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सलग चौथ्या वर्षी उत्कृष्ट महाविद्यालय

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत गेल्या चार वर्षापासून महाविद्यालयात करिअर संदर्भात जनजागृती करण्यासाठी आणि नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने गेल्या पाच वर्षापासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, उद्योजकीय विकास कौशल्य उपक्रम, व्यक्तिमत्व विकास, करिअर संसदेची स्थापना, पूरग्रस्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मदत, कौशल्य विकास, ड्रोन फ्लाईंग प्रशिक्षण, समृद्धी महामार्गावरील करिअरच्या संधी, मतदान जनजागृती कार्यक्रम, आर्थिक साक्षरता अशा अनेक महत्त्वाच्या विषयावर भरीव अशा प्रकारचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन 2025-26 चा उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाला मिळाला आहे. उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार मिळण्याचे हे छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे सलग चौथे वर्ष आहे.

राज्यस्तरीय पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री नामदार उदय सामंत, खादी ग्रामोद्योग महामंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे प्रमुख यशवंत शितोळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महाविद्यालयाला सलग चौथ्या वर्षी हा पुरस्कार मिळाल्याबद्दल

मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहरपंत सपाटे , प्रा. महेश माने, सुरेश पवार, मुकुंद जाधव, सचिन गायकवाड, दत्ता भोसले, प्राचार्य डॉ. नितीन मोटे, इत्यादींनी करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक डॉ. वाल्मिक कीर्तीकर व करियर कट्टा उपक्रमातील सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

शेणाच्या गोवऱ्या खरातच्या पोस्टरला खाऊ घालत मनसेचं आंदोलन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- विकृत भोंदू बाबा अशोक खरात याच्याविरोधात आंदोलन महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहर व जिल्ह्याच्यावतीने विकृत भोंदू बाबा अशोक खरात याच्या विरोधात चार हुतात्मा चौक येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी खरातच्या विरोधात अनेक घोषणा देण्यात आल्या. विकृत भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात याच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रात विविध प्रकारचे आंदोलन आणि निषेध व्यक्त करण्यात येत आहे. असेच आंदोलन सोलापूर मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना तसेच महाराष्ट्र निर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या नेतृत्वाखाली चार हुतात्मा चौक येथे करण्यात आले याप्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर अध्यक्ष जैनुद्दीन शेख मनसे विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष संतोष कुमार घोडके, मनसे वाहतूक सेनेचे शहर संघटक जितेंद्र टेंभुर्णीकर, प्रकाश कोळी, विश्वास गजभार, गोविंद बंदपट्टे, सोपान महिंद्रकर, वैभव रंपुरे, रविंद्र कांबळे, विठ्ठल बंडा, समर्थ माळगे, अभिषेक इरकल, श्रीराज महिंद्रकर, विनायक माढेकर व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी व मनसैनिक उपस्थित होते.

लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची दक्षिण भारतात शैक्षणिक सहल

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दक्षिण भारतातील कर्नाटक येथे आयोजित करण्यात आली होती. या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी शिरसी, याना, विभूती धबधबा, गोकर्णा, मालपे बीच, श्री क्षेत्र मुरूडेश्वर, कायाकिंग, उडुपी श्रीकृष्ण मंदिर, श्री मंजुनाथस्वामी मंदिर धर्मस्थळ, बंदाजे धबधबा ट्रेक, मैसूर पॅलेस, चामुंडेश्वरी मंदिर, श्री वेणुगोपाळस्वामी मंदिर, वृंदावन गार्डन, जागतिक वारसा स्थळ विजयनगर साम्राज्याची राजधानी असलेल्या हंपी येथील विरूपाक्ष मंदिर, विठ्ठल मंदिर व रथ, अंजनाद्री मंदिर आदी पर्यटन व धार्मिक स्थळांना भेट दिली. या सहलीसाठी प्रा. आशिष सरकाळे यांचा सहभाग होता. या शैक्षणिक सहलीसाठी मंजुनाथ कुंभार, नक्षत्रा कांबळे, अभिजीत तनपुरे व तृप्ती जाधवर यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून कार्य पार पाडले. या शैक्षणिक सहलीसाठी संस्थेचे अध्यक्ष रोहनजी देशमुख, सचिव डॉ अनिता ढोबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन व सर्व प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

संविधान भवन डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका केंद्रच्या स्लॅबचे पूजन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- बुधवार पेठ मिलिंद नगर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मादगी व वाल्मिकी नगर मुन्सिपल कॉलनी येथे जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था संचलित नियोजीत संविधान भवन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका केंद्राच्या पहिल्या मजल्याच्या स्लॅब चे पूजन सोलापूर शहराचे महापौर माननीय विनायक त्रदादात्र कोंड्याल व सोलापूर महानगरपालिका स्थायी समितीच्या चेअरमन सौ. रंजीतात्रताईत्रचाकोते यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी बोलताना महापौर विनायक दादा कोंड्याल म्हणाले की जी.एम संस्था संचलित नियोजित संविधान भवन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका केंद्राच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्या प्रमाणे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही

हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार डोळ्यासमोर ठेवून जी.एम संस्था गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासिका केंद्र व तसेच यूपीएससी एमपीएससी व स्पर्धा परीक्षेसाठी तज्ञांचे मार्गदर्शन व अभ्यास केंद्र, अद्यावत अशी लायब्ररी, संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय आशा अद्यावत संविधान भवन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मोफत अभ्यासिका केंद्रास सोलापूर महानगरपालिका च्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करूण सहकार्य करण्याच आश्वासन या वेळी बोलताना महापौर विनायक दादा कोंड्याल व स्थायी समितीच्या चेअरमन सौ.रंजीता ताई चाकोते यांनी दिलं व जीएम संस्था संस्थापक बाळासाहेब वाघमारे यांच्या कार्याचे कौतुक केलं.

या कार्यक्रम प्रसंगी जी.एम संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे नगरसेविका सौ. श्रीदेवीत्रताईत्रफुलारे जी.एम संस्थेचे विश्वस्त शशिकांत उर्फ पप्पू गायकवाड जी.एम संस्थेचे सल्लागार राजाभाऊ हौशेट्टी उत्सव अध्यक्ष अभि क्षिरसागर आप्पासाहेब बागले दत्ता शिंदे नरेंद्र शिंदे आप्पासाहेब गायकवाड उमेश गायकवाड यशपाल वाघमारे उमेश लोंढे नेहाल क्षीरसागर पिंटू मेटकरी संतोष बागले अभिनंदन गायकवाड मॅडी दुपारगुडे प्रभाकर जगताप रुपेश उबाळे अझहर शेख निशांत त्रकालीत्र वाघमारे रघुराज बनसोडे यशराज बनसोडे निशांत वाघमारे शिवा भणगे बापू चलवदे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होता.

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात; एकाचा मृत्यू, एक जखमी

माढा (कटूसत्य वृत्त):- सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर मौजे शिराळ पाटीजवळ दोन मोटरसायकलींची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी हा अपघात घडला. यात बंडू बाळू लोकरे (वय ४०, रा. शिराळ टें., ता. माढा, जि. सोलापूर) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की लोकरे यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. या अपघातात समोरील मोटरसायकलवरील सचिन सिद्धाराम परीट (वय २७, रा. केगाव, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. तसेच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले विधानसभेचे कामकाज

मुंबई (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नुकतीच विधान भवन येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज प्रेक्षक गॅलरीतून प्रत्यक्ष पाहून लोकशाही प्रक्रियेचा अनोखा अनुभव घेतला. सभागृहातील कामकाज कशा पद्धतीने चालते, लोकप्रतिनिधी जनतेचे प्रश्न कसे मांडतात आणि राज्याच्या विकासासाठी निर्णय कसे घेतले जातात, याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मुंबई भेटीबाबत माहिती देताना आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले की, प्रत्येकालाच मुंबई या शहराचे आकर्षण असते. आयुष्यात एकदा तरी मुंबई पाहण्याची इच्छा प्रत्येकाच्या मनात असते. या शहरातील अनुभवांमुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना नवे आयाम मिळतात, स्वप्नांना पंख फुटतात आणि मोठी ध्येये गाठण्याची प्रेरणा मिळते.

जिल्हा परिषदेतील शाळेतील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना गुणवंत विद्यार्थ्यांना विविध सभा व विधान परिषदेतील कामकाज दाखवण्यासाठी व मुंबई दर्शन करण्यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी घेतलेला पुढाकार हा कौतुकास्पद असून मी देखील माज्या मतदारसंघातील जिल्हा परिषदेतील मुलांना घेऊन येण्याचा संकल्प केला असल्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी उद्गार काढले.

ग्रामीण भागातील विद्यार्थी जेव्हा पहिल्यांदाच मुंबईसारख्या मोठ्या शहरात येतात, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतील आनंद, उत्साह आणि उंच भरारी घेण्याची स्वप्ने खरोखरच प्रेरणादायी असतात. भविष्यात हेच विद्यार्थी उच्च अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी बनून अशाच सभागृहात काम करताना दिसावेत, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला असून, त्यांच्या आनंदात सहभागी होणे समाधानकारक असल्याचेही आमदार पाटील यांनी नमूद केले.

मुंबईत दिलेल्या भेटी :

या शैक्षणिक दौऱ्यात विद्यार्थ्यांनी गेटवे ऑफ इंडिया, मंत्रालय, नरिमन पॉईंट, वानखेडे स्टेडियम तसेच विविध राजकीय नेत्यांची शासकीय निवासस्थाने, उद्योजकांचे बंगले, अभिनेत्यांची घरे आणि खाऊगल्ली यांना भेट दिली. मुंबईतील उंचच उंच इमारती पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि कुतूहल स्पष्ट दिसून येत होते.

6 एप्रिल रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक 06 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली.

Classified - छोटी जाहीरात

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं. /२०२६

मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर

मीनाक्षी नागनाथ मोटे
मीनाक्षी दत्तात्रय खटके (लग्न नंतरचे नाव) }अर्जदार
वय ४५ वर्ष व्यवसाय - मजुरी
रा- शिंगोली ता. मोहोळ
विरूद्ध
ग्रापंचायत शिंगोली / तरटगाव ता. मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मीनाक्षी नागनाथ मोटे यांचा जन्म दि.१/६/१९८२ रोजी शिंगोली ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे मीनाक्षी नागनाथ मोटे यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन १९८२ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.२७/३/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर

जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं. /२०२६

मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर

सचिन जयवंत वाघमोडे
वय ४५ वर्ष व्यवसाय - मजुरी }अर्जदार
रा- कोळेगाव ता. मोहोळ
विरूद्ध
ग्रापंचायत कोळेगाव ता. मोहोळ }सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी अक्षता सचिन वाघमोडे यांचा जन्म दि.११/६/२०११ रोजी कोळेगाव ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे अक्षता सचिन वाघमोडे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुन २०११ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/४/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २७/३/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ मोप्र-१ दिनांक : १८/१०/ २०२३

परिशिष्ट-४

(निविदेसाठी जाहिरात नमुना)

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ पुणे ३७ यांचे कार्यालय,

पत्ता : नविन मुठा कालव्याशेजारी, स्वारगेट, पुणे - ४११०३७.
ई मेल:- eemd123@gmail.com, दूरध्वनी क्रमांक. ०२०-२४२६६०११

निविदा सुचना क्र : १४ सन २०२५-२०२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र. २ पुणे ३७ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

अ. क्र.	कामाचे नांव	जिल्हा	निविदा किंमत (वस्तु व सेवाकर वगळुन)
१	लघु प्रकल्प चिक्कलगी (शिरनांदगी) ता. मंगळवेढा येथील मुख्य विमोचकाची द्वार दुरुस्ती करणे.	सोलापूर	२,९३,४५३/-

निविदा उपलब्ध कालावधी: दि :२७/०३/२०२६ वेळ :११.०० ते दि :०६/०४/२०२६ वेळ : १८.००
निविदा स्वीकृती व उघडण्याचा दिनांक: दिनांक-०८/०४/२०२६ वेळ:दुपारी २.०० वा. (शक्य झाल्यास)
जा. क्र. ८०३, दिनांक : १८/३/२०२६
कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ पुणे ३७

सही/-
(शा.वा. काझी)
कार्यकारी अभियंता
यांत्रिकी विभाग क्र. २, पुणे ३७

जिमाका/सो/जाहि/४२०/२०२५-२६

कटूसत्य शब्दकोडे

उभे शब्द : १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दुःख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

आडवे शब्द : १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

सुडोकु - 194

			1			2		4
		7	5	8	6	9	1	3
	1		3					7
	3		6	5		4	7	9
		8	7		3		6	2
			2			5		8
8	7							
	4	9		1			2	
2	5		4			8	9	

शहीदांच्या विचारांची ज्वाला पेटली सोलापुरात युवा महासंघाची आक्रमक मशाल रॅली

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- शहीद भगत सिंग सुखदेव राजगुरू यांच्या स्मृतीदिनानिमित्त भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ, जिल्हा समिती सोलापूरच्या वतीने क्रांतिकारी अभिवादन व आक्रमक मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी सांगितले की, भगतसिंग यांचे साम्राज्यवाद विरोधी विचार हे केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्ध नव्हते, तर शोषणमुक्त, समताधिष्ठित समाज उभारण्याचे व्यापक स्वप्न होते. आजच्या काळात युद्ध, आर्थिक विषमता आणि मानवी हक्कांवरील हल्ले वाढत असताना हे विचार अधिकच प्रासंगिक ठरत आहेत.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून करण्यात आली. जिल्हा अध्यक्ष विक्रम कलबुर्गी व सीटूचे नेते युसुफ शेख मेजर यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आली. रॅली सरस्वती चौक, लकी चौक मार्गे चार हुतात्मा पुतळा येथे दाखल झाली. तेथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व चार हुतात्मा यांना पुष्पहार अर्पण करून समारोप करण्यात आला.

यावेळी युवा महासंघाचे केंद्रीय समिती सदस्य ॲड. अनिल वासम यांनी आपल्या भाषणात केंद्र व राज्य सरकारच्या युवक, विद्यार्थी, शिक्षण व रोजगार धोरणांवर तीव्र टीका केली. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, 'आज देशातील तरुण बेरोजगारीच्या विळख्यात अडकला आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण करून सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवले जात आहे. रोजगार निर्मितीच्या नावाखाली केवळ घोषणाबाजी केली जाते, प्रत्यक्षात तरुणांच्या हाताला काम नाही.'

पुढे ते म्हणाले, 'भगतसिंगांनी ज्या शोषणमुक्त समाजाचे स्वप्न पाहिले, त्याच्या विरुद्ध आज धोरणे राबवली जात आहेत. युवकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरोधात संघर्ष तीव्र करणे ही काळाची गरज आहे. जर सरकारने तात्काळ ठोस पावले उचलली नाहीत, तर रस्त्यावर उतरून व्यापक आंदोलन उभारले जाईल.

युवकांना संबोधित करताना ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी युवकांना संबोधित करताना आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी सांगितले, 'भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी अन्यायाविरुद्ध लढा देत बलिदान दिले. आज त्या विचारांना केवळ स्मरण करून चालणार नाही, तर ते प्रत्यक्षात उतरवण्याची गरज आहे.' ते पुढे म्हणाले, 'देशात वाढती बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक विषमता ही गंभीर समस्या आहे. या विरोधात युवकांनी संघटित होऊन संघर्ष उभारला पाहिजे. अन्याय सहन करणे हा पर्याय नाही—तर त्याविरुद्ध उभे राहणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

कार्यक्रमास अशोक बल्ला विल्यम ससाणे, बापू साबळे, मुरलीधर सुंचु, विजय हरसुरे, बालकृष्ण मल्याळ, मधुकर चिल्लाळ, नरेश गुल्लापल्ली, किशोर झेंडेकर, दिनेश बडगु, बजरंग गायकवाड, बालाजी गुंडे, वीरेंद्र पद्मा, दीपक निकंबे, अभिजित निकंबे, अश्विनी मामाड्याल, आप्पाशा चांगले, राहुल बुगले , चंटी बिटला, बालाजी तुम्मा, शिवा श्रीराम, आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

सीना- माढा उपसा सिंचन योजना सुरूच राहणार
आ. अभिजीत पाटील यांच्या पुढाकारातून ना.विखे-पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले आदेश

माढा (कटूसत्य वृत्त):- सध्या काही लोक अफवा पसरवून, शेतकऱ्यांना वेटीस धरत असल्याचे दिसत आहेत, तरी कोणीही कोणत्याही भूलथापांना किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत टेल टू हेड पाणी पोचेपर्यंत आम्ही कटिबद्ध असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची विधानभवनात भेट घेऊन सीना -माढा उपसा सिंचन योजना बंद न करण्याबाबतचे पत्र दिले असता, योजनेवर मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकीत असली तरी हि योजना परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत असल्याचे सांगितले. हि योजना बंद झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर याची तात्काळ दखल घेत विखे-पाटील साहेबांनी लगेचच फोनवरून संबंधित अधिकाऱ्यांना योजना सुरू ठेवण्याचे स्पष्ट आदेश दिले.

या योजनेतून टेल टू हेड शेतकऱ्यांना पाणी मिळेपर्यंत सुरळीत चालणार असल्याची नोंद सर्व शेतकरी बांधवांनी घेण्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

सोलापूर शहरातील माध्यमिक मुख्याध्यापकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा

सोलापूर,(कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ सोलापूर यांच्यावतीने शहरातील मुख्याध्यापक व तंत्रस्नेही शिक्षकांसाठी एकदिवसीय शैक्षणिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि.२७ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित कार्यशाळेचे उदघाटन शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांच्या हस्ते, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.या कार्यशाळेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा अध्यापनात प्रभावी वापर, अध्यापनासाठी उपयुक्त AI Tools चा उपयोग तसेच शाळा व्यवस्थापनाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत अध्यापन अधिक परिणामकारक करण्याची संधी मिळणार आहे.या बदलत्या शिक्षण व्यवस्थेत तंत्रज्ञानाची भूमिका अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.शिक्षण क्षेत्रातील नव्या प्रवाहांना दिशा देणारा हा उपक्रम असल्याने या कार्यशाळेस सोलापूर शहर व परिसरातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सोलापूर शहर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्यावतीने करण्यात आले आहे.

दादर-पंढरपूर-सातारा-दादर रेल्वे प्रतिदिन चालवून चंद्रभागा एक्सप्रेस नाव द्यावे- खा.धैर्यशील मोहिते पाटील

अकलूज (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्याच्या वाहतूक, व्यापार, शेती आणि दळणवळणाच्या विकासाला गती देण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केंद्रीय रेल्वे व माहिती-प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन पूर्वी मांडलेल्या विविध महत्त्वाच्या मागण्यांचा पाठपुरावा केला.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब येथे गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल (GCT) उभारणी लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या प्रकल्पामुळे औद्योगिक तसेच कृषी मालवाहतूक सुलभ होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

तसेच, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरलेली आणि सध्या बंद असलेली दिल्ली कोलकत्ता मुजफ्फरनगर शालिमार येथे जाणारी किसान रेल्वे सेवा पुन्हा सुरू करावी, व अकलूज शहरात एफएम रेडिओ केंद्र स्थापन करण्यासाठीच्या मागणीचा देखील पाठपुरावा केला.

याशिवाय दादर -पंढरपूर -सातारा -दादर ही रेल्वे दररोज चालवून तिला 'चंद्रभागा एक्सप्रेस' असे नाव द्यावे, तसेच वारकरी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी पंढरपूर-देहू मेमू रेल्वे सेवा सुरू करावी, अशी मागणीही करण्यात आली.

लातूर-कुडूर्वाडी-सोलापूर व मिरज-कुडूर्वाडी-दौंड 'कॉर्ड लाईन' उभारणीसाठी तसेच मिरज-कुडूर्वाडी-लातूर रोड (सुमारे ३७५ किमी) रेलमार्गाच्या दुहेरीकरणासाठी जमीन अधिग्रहण व आवश्यक कार्यवाही तातडीने करावी, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली.

तसेच सोलापूर रेल्वे विभागांतर्गत वाढती लोकसंख्या व पंढरपूरकडे येणाऱ्या लाखो वारकऱ्यांची सोय लक्षात घेऊन सांगोला तालुक्यातील जवळा व बामणी, पंढरपूर तालुक्यातील बाभुळगाव तसेच माढा तालुक्यातील म्हैसगाव व लऊळ येथे नवीन रेल्वे स्थानके उभारण्याचा प्रस्ताव मंजूर करावा, अशीही मागणी करण्यात आली.

माढा मतदारसंघातील मोडनिंब रेल्वे स्थानकावर प्रमुख गाड्यांचा थांबा, फूटओव्हर ब्रिज, शेतकऱ्यांसाठी अंडरपास, आरक्षण काउंटर तसेच स्थानिक (शटल) गाड्यांचा थांबा तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, कुडुर्वाडी-पंढरपूर मार्गावरील जुना मीटर गेज रेल्वे ट्रॅक सध्या वापरात नसून त्या ठिकाणी रेल्वेची मौल्यवान जमीन रिक्त अवस्थेत पडून आहे. या जमिनीचा विकासात्मक वापर करून तेथे "व्यापारी संकुल उभारण्यात यावे, अशी मागणी व त्याचा पाठपुरावा खासदार मोहिते-पाटील यांनी केला.

या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्याची माहिती देण्यात आली.

कार्डधारकांना प्रत्येकी ३ लिटर रॉकेल देणार
गॅसटंचाईवर तोडगा शोधण्याचा प्रयत्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना रेशन दुकानातून केरोसीन (रॉकेल) वाटप करण्यास तत्त्वतः मंजुरी देण्यात आली असून प्रत्येक कार्डधारकाला ३ लिटर रॉकेल देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दर निश्चितीबाबतचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती पुरवठा विभागाचे राज्य समन्वयक चंद्रकांत डांगे यांनी दिली.

मंगळवारी झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये डांगे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी संवाद साधत रॉकेल वाटपाच्या नियोजनाचा आढावा घेतला. सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या संघर्षामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला असून जिल्ह्यात गॅसटंचाई तीव्र झाली आहे.

सोलापुरातील गॅस एजन्सीसमोर ग्राहकांच्या लांबलचक रांगा लागल्या असून दररोज सुमारे ७० हजार सिलिंडरची मागणी होत असताना केवळ २० हजार सिलिंडर्सचा पुरवठा होत आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या तुटवड्याची तीव्रता लक्षात घेऊन शासनाने पयार्यी उपाय म्हणून रॉकेल वाटपाचा निर्णय घेतला आहे.

शासनाने सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांना रॉकेल देण्याची भूमिका घेतली असली, तरी अद्याप अधिकृत आदेश जारी झालेले नाहीत. यासाठी जिल्ह्यातील संभाव्य लाभार्थ्यांची माहिती शासनाने मागवली आहे.

दरम्यान, पुरवठा विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील सुमारे ३ लाख ९० हजार शिधापत्रिकाधारकांकडे स्टोव्ह उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले आहे. शहर भागात मात्र केवळ ५ हजार नागरिकांकडे स्टोव्ह उपलब्ध असल्याची माहिती अन्नधान्य वितरण विभागाने शासनाला सादर केली आहे.

गॅसटंचाई कमी करण्यासाठी आणि सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

'श्रीकृष्ण गुरुकुल' च्या वर्धापनदिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- कामती बुद्रुक येथील श्रीकृष्ण गुरुकुलच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, २८ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक प्रा. प्रमोद आवताडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमात ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील, मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे आणि अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार असून कार्यक्रमाला माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

याबाबत अधिक माहिती देताना प्रा. आवताडे यांनी सांगितले की, २०२१ मध्ये मोहोळ तालुक्यातील वाघोलीवाडी येथील माळावर श्रीकृष्ण गुरुकुलची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील, विशेषतः शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना गुरुकुल पद्धतीचे शिक्षण मिळावे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. पालकांनी दाखवलेल्या विश्वासामुळे या उपक्रमाचा विस्तार होत असून आता गुरुकुलचे तीन संस्थांमध्ये रूपांतर झाले आहे.

कामती बुद्रुक येथील राधा गुरुकुल हे मुलींसाठी निवासी शिक्षण देणारे केंद्र आहे, तर कामती खुर्द (लामालतांडा) येथे एम. बी. चव्हाण गुरुकुल या ज्युनिअर कॉलेजची उभारणी करण्यात आली आहे.

वर्धापन दिनानिमित्त विश्वास पाटील, राज्यसभा खासदार डॉ. ज्योती बाघमारे, माजी आमदार राजन पाटील, प्रगतिशील शेतकरी नेते रामराव भोसले पाटील, मार्गदर्शक जालिंदर लांडे तसेच सरपंच अंजली पाटील यांचा सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी संस्थेचे स्नेहसंमेलनही आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. आवताडे यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस ज्येष्ठ नेते पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष निकम, जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष दीपक माळी, सभापती राहुल जयसिंग आवताडे, प्राचार्य शिनगारे, प्राचार्य कोळी, प्रा. ज्ञानेश्वर शिंदे आदी उपस्थित होते.

सोलापूरात LPG दरवाढी विरोधात रिक्षाचालकांचा इशारा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देत ऑटो रिक्षासाठी वापरल्या जाणाऱ्या LPG इंधनाच्या दरवाढी, कमतरता आणि चालकांच्या आर्थिक अडचणींबाबत तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शहरातील विविध LPG पंपांवर वेगवेगळे दर आकारले जात असून काही ठिकाणी ८५ ते ८७ तर काही ठिकाणी १८२.९५ प्रति लिटर दराने विक्री होत आहे. यामुळे रिक्षाचालकांवर मोठा आर्थिक भार पडत असून मनमानी दर आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

तसेच LPGची कमतरता असल्याने चालकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. परिणामी अनेक रिक्षा बंद पडल्या असून दैनंदिन उत्पन्न ठप्प झाले आहे. याचा परिणाम चालकांच्या कुटुंबांवर होत असून उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महासंघाने दर एकसमान करणे, पंपांची चौकशी, पुरवठा सुरळीत करणे तसेच बँक व फायनान्स वसुलीला स्थगिती देण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, प्रदीप आबा शिंदे, इरफान कल्याणी, सरफराज बागवान, लाडजी नदाफ, यासह वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महेश पांढरे यांची पीएसआयपदी निवडीबद्दल पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- नातेपुते येथील महेश विठ्ठल पांढरे यांची एमपीएससी परीक्षेत यश मिळवत पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर निवड झाली आहे. त्यांच्या निवडी बद्दल सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महेश पांढरे यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या तसेच महेश पांढरे यांचे नातेपुते शहरात त्यांच्या यशाची मिरवणूक काढून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.महेश पांढरे यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण नातेपुते येथील बा. ज. दाते प्रशालेत त्यानंतर अकरावी-बारावीचे शिक्षण बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात झाले. पुढे त्यांनी पुणे येथे अभियांत्रिकी शिक्षण घेतले असून ते इंजिनिअरिंगमध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी महेश यांच्यावर आली. वडिलांची अधिकारी होण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांनी इंजिनिअरिंगची नोकरी सोडून एमपीएससीची तयारी सुरू केली आणि अखेर पीएसआय पदावर निवड मिळवली. या यशामागे आई व बहिणींचा भावनिक आधार तसेच वडिलांनी दिलेली अधिकारी होण्याची प्रेरणा कारणीभूत असल्याचे महेश पांढरे यांनी सांगितले. त्यांच्या निवडीनंतर शहरातील विविध सामाजिक संस्था, राजकीय, शैक्षणिक, क्रीडाक्षेत्र, गणेशोत्सव मंडळे आणि नागरिकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

देगांव गॅस दाहिनी अखेर कार्यान्वित
नगरसेवक गणेश वानकर यांच्या प्रयत्नांना यश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- प्रभाग क्रमांक सहाचे नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य गणेश वानकर यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत गॅस दहिनी स्मशानभूमीचा प्रश्न उपस्थित करताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि देगांव गॅस दाहिणी स्मशानभूमी कार्यान्वित झाली.

सोलापूर महानगर पालिकेच्या वतीने आणि स्मार्ट सिटीच्या माध्यमातून जवळपास 22 कोटी रुपये खर्च करून सोलापूरातील विविध भागात असलेल्या स्मशानभूमीमध्ये गॅस दाहिनी बसवण्यात आले आहेत परंतु गेल्या साडेतीन ते चार वषार्पासून प्रशासक राज असल्यामुळे स्मार्ट सिटी व महापालिका यांच्यातील अंतर्गत वादामुळे हा विषय गेल्या चार वषार्पासून रखडला होता सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुका होतात पहिल्याच सर्वसाधारण सभेत नगरसेवक गणेश वानकर यांनी देगांव गॅस दाहिणी संदर्भात सर्वसाधारण सभेत प्रस्ताव देत प्रशासनाला धारेवर धरले सभागृहामध्ये प्रश्नांची सरबत्ती केल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले आणि तात्काळ देगाव गॅस दाहिणी कार्यान्वित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आज सकाळी नगरसेवक गणेश वानकर यांनी देगांव येथील प्रतिष्ठित नागरिकांसमवे या गॅस दाहिनीला भेट देऊ गॅस दाहिनी कशा पद्धतीने कार्यान्वित होणार आहे याची इत्यंभूत माहिती महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य गणेश वानकर आणि ग्रामस्थांना गॅस दाहिणीवर अंतिमसंस्कार कशा पद्धतीने याची माहिती दिली या सदैवणीवर अंतिम संस्कार केल्यास खर्चही कमी येणार असून पर्यावरणाचा समतोल ही राखण्यात येणार आहे देगांव गॅस दाहिणी परिसरात काही कामे अद्याप करावयाची बाकी आहेत ती कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य गणेश वानकर यांनी प्रशासनाला दिल्या यावेळी देगांव मधील संतोष दांडगे,प्रभाकर नाना कोठे, सुधाकर भाऊ काळे,शिवाजी जाधव, योगेश कोळी, अभिजीत सावकार सुपाते, अमर कस्तुरे, संभा वाघ,गोटू ताकमोगे,नितीन कोठे,योगी कोळी,अरुण भैया जाधव, व महानगरपालिका विद्युत विभागाचे इलेक्ट्रिक इंजिनिअर प्रतीक कोल्हे उपस्थित होते.

झेडपी, पंचायत समितीला 29 कोटींचा निधी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केंद्रीय वित्त आयोगाकडून सोलापूर जिल्हा परिषद आणि दहा पंचायत समित्यांसाठी मिळून 29 कोटी 22 लाखांचा निधी मंजूर केला आहे. त्यातील 14 कोटी 61 लाख जिल्हा परिषदेला तर 14 कोटी 61 लाख रुपयांचा निधी पंचायत समित्यांना मिळणार आहे. पालकमंत्री गोरे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीआधी झेडपी सदस्य, पंचायत समितीचे सभापती, सदस्यांना मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे आश्वासन दिले होते. सत्ता आल्यानंतर त्यांनी 29 कोटी 22 लाखांचा निधी आणून दिलेला शब्द पाळला आहे. जिल्हा परिषद आणि दहा पंचायत समितीवर भाजपाची सत्ता आणल्यानंतर पालकमंत्री गोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अतिरिक्त निधी मिळावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा करत होते. त्याला यश आले असून, केंद्रीय वित्त आयोगाने जिल्हा परिषदेसाठी 14 कोटी 61 आणि पंचायत समित्यांसाठी 14 कोटी 61 लाख रुपयांचा निधी दिला आहे. या निधीतून पाणी पुरवठा, स्वच्छता विषयक कामे, गाव अंतर्गत गटारी, रस्ते, शाळा, अंगणवाडी कामे, आरोग्य केंद्राची दुरुस्ती, स्मशानभूमी, जोडरस्ते, पथदिवे आदी विकास कामे होणार आहेत.

तालुकानिहाय निधी

अक्कलकोट - एक कोटी 29 लाख, बार्शी - एक कोटी 23 लाख, करमाळा - एक कोटी 25 लाख, माळशिरस - एक कोटी 93 लाख, मोहोळ - एक कोटी 22 लाख, मंगळवेढा - एक कोटी 83 लाख, उत्तर सोलापूर - 65 लाख 96 हजार, पंढरपूर - एक कोटी 67 लाख, सांगोला - एक कोटी 47 लाख, दक्षिण सोलापूर - एक कोटी 34 लाख असे एकूण 14 कोटी 61 लाख रुपयांचा निधी पंचायत समित्यांना देण्यात येणार आहे.

रिक्षावाल्याचा मुलगा कृषी विद्यापीठात पहिला, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गोल्ड मेडल

बार्शी (कटूसत्य वृत्त):- प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि कुटुंबाच्या पाठबळाच्या जोरावर बार्शीतील चैतन्य निहालकुमार व्हनकळस याने कृषी शिक्षणात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. रिक्षाचालकाच्या मुलाने एमएस्सी (हॉर्टीकल्चर -व्हेजिटेबल सायन्स) या विषयात विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवत 'बीएसएस सुरेश अग्रवाल सुवर्णपदक'पटकावले आहे. राहुरी कृषी विद्यापीठात पार पडलेल्या ३९ व्या पदवीदान समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते चैतन्यला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

साध्या कुटुंबातून आलेल्या चैतन्यसाठी हा क्षण संघर्षाच्या यशस्वी प्रवासाचा परिपाक ठरला. चैतन्यचे वडील निहालकुमार व्हनकळस हे रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आर्थिक अडचणी असूनही त्यांनी मुलाच्या शिक्षणात कोणतीही तडजोड होऊ दिली नाही. आई रोहिणी, आजी कस्तुरबाई आणि भाऊ प्रविण यांनीही त्याला सतत प्रोत्साहन दिले. बाशीर्तील कर्मवीर मामासाहेब जगदाळे शैक्षणिक संकुलात चैतन्यचे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर बारामती कृषी महाविद्यालयातून बीएस्सी (ॲग्री) पूर्ण करून त्याने एमएस्सी (हॉर्टीकल्चर) मध्ये प्रवेश घेतला. पहिल्याच वर्षी 'प्रतिभा पवार गोल्ड मेडल' मिळवत त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली. दुसऱ्या वर्षातही उत्कृष्ट कामगिरी कायम ठेवत अखेर विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळवला.

चैतन्यचे हे यश कष्टकरी व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, 'परिस्थिती नव्हे, तर जिद्द माणसाला मोठं बनवते,' हा संदेश त्याने आपल्या यशातून दिला आहे. सध्या बार्शी शहरासह परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.